विवा मेक्सिको!

बेनिटो जुआरेझ

अर्जेंटीना पलासियोस



मेक्सिको देशातील उंच पर्वतावर, उन्हात पक्क्या केलेल्या विटांचे, दोन खोल्यांचे छोटे घर होते. घरातली फरशी पण तशी घाणच होती. घरात अगदी मोजके सामान होते. एका गरीब गावातील एका गरीब कुटुंबाचे हे घर होते.

दोन पैकी एका खोलीत जोसेफ आणि रोजा जुआरेझ कुणाची तरी वाट बघत होत्या. आज संध्याकाळपर्यंत त्यांना एक धाकटी बहीण किंवा भाऊ मिळणार अशी त्यांना खात्रीच होती. बाळाचे पहिले रडू ऐकण्यासाठी त्या मन लावून, शांत बसून होत्या. ‘बाळाला यायला इतका का वेळ लागतोय’ असा विचार करत असतानाच त्या दोघींना बाळाच्या नाजूक रडण्याचा आवाज आला.

”बाळ आले!” असे ओरडत त्या आईच्या खोलीत गेल्या. आईने आनंदाने त्यांना त्यांचा भाऊ दाखवला. किती छोटुकला होता तो!

त्याचे डोळे घट्ट मिटलेले होते. जेव्हा त्याने डोळे उघडले तेव्हा त्याचेही डोळे त्याच्या तायांसारखे गडद तपकिरी रंगाचे होते.

आई-बाबांनी बाळाचे नाव बेनिटो ठेवले. त्यावेळी त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते की एके दिवशी सर्व मेक्सिको देशात तो महान व्यक्ती म्हणून ओळखला जाईल.

या गरीब कुटुंबाने बेनिटोला खूप प्रेम दिले. त्याशिवाय दुसरे देण्यासारखे या कुटुंबाकडे होते तरी काय?

जुआरेझ कुटुंब त्यांच्या शेजाऱ्यांप्रमाणे ‘झापोटेक इंडियन्स’ या स्थानिक जमातीचे होते. मेक्सिकोची राष्ट्रभाषा स्पॅनिश असूनही खूप कमी झापोटेक इंडियन्सना स्पॅनिश बोलता यायचे. यांच्यापैकी खूप कमी लोकांना लिहिता – वाचता यायचे. झापोटेक लोक इतके गरीब होते की त्यांच्या गावात एक साधी शाळाही नव्हती.



बेनिटो तीन वर्षांचा असताना एक दुःखद घटना घडली. या घटनेने त्याचे आयुष्यच बदलून गेले. त्याच्या आई-वडिलांचे निधन झाले. मग त्याच्या आजी-आजोबांनी या तीन जुआरेझ मुलांना आपल्या घरी आणून पुढची आठ वर्षे त्यांचा सांभाळ केला. बेनिटो अकरा वर्षांचा असताना त्याच्या आजी-आजोबांचेही निधन झाले. मग तो जवळच्या गावातल्या त्याच्या बर्नार्डिनो काकाकडे राहायला गेला.



काकाच्या मेंढ्यांची देखभाल करायचं काम बेनिटोचे होते. तो रोज मक्याच्या शेतात मेंढ्यांना चरायला नेत होता. एका दुपारी बेनिटो काकाच्या घराशेजारील शेतात उभा होता. आजूबाजूला सगळीकडे मेंढ्याच मेंढ्या होत्या.



आता हे मक्याचे शेत झाले डौलदार होते. काका शेतातील तण काढत होता. फार कष्टाचे काम होते ते. लवकरच बेनिटो काकाला मक्याची कापणी करायला मदत करणार होता.

तेवढ्यात “बॅऽऽ” आवाज आला. बेनिटोने मागे वळून मेंढ्यांच्या कळपाकडे नजर फिरवली. मेंढ्या इथे तिथे जात नाहीत नाही ना याची खात्री केली.



काका थोडेफार शिकला होता. बेनिटोलाही लिहिता वाचता यावे अशी काकाची इच्छा होती. त्याला जसा वेळ मिळायचा तसा तो बेनिटोला शिकवायचाही. बेनिटोला शिकण्याची खूप आवड होती. काकाने शेतात आपल्याजवळ बसून अजून नवीन नवीन शिकवावे अशी त्याची इच्छा होती. पण दिवसभराच्या शेताच्या कामामुळे काकाला फारसा वेळ मिळत नसे.

मग बेनिटोला एक कल्पना सुचली. तो शिक्षक आणि मेंढ्या त्याच्या विद्यार्थी! अशी त्यांची शाळा भरू लागली. त्याला जे येत होते ते तो मेंढ्यांना शिकवत होता. कधी कधी एखादी मेंढी तोंड वर करून बेनिटोकडे एक टक बघत असे तेव्हा बेनिटोला वाटे, “आहा! किती हुशार विद्यार्थी आहे ही!” पण लगेचच ती मेंढी डोके खाली घालून गवत चरण्यात गुंग जात असे.

आता बर्नार्डिनो काकाला जे जे येत होते ते बेनिटो शिकला होता. आता त्याला शाळेत जाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. त्यातल्या त्यात जवळची शाळा पण 40 मैल दूर ओक्साका शहरात होती.

बेनिटोची बहीण जोसेफा आता त्या शहरात काम करत होती. तिच्याकडे राहून आपल्याला शाळेत जाता येईल असा विचार केला. ते फार सोयीचे नसणार होते तरीही बेनिटोने काकाचे घर सोडण्याचा निर्णय घेतला. शाळेत जायचे असेल तर त्याच्याकडे याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

बेनिटोकडे इतक्या दूरच्या प्रवासासाठी न घोडागाडी होती ना दुसरी कुठली सोय. त्याच्याकडे एकच गोष्ट होती ती म्हणजे त्याचे दोन मजबूत पाय!

अनेक मैल डोंगराळ भागातून, खडकाळ पायवाटांवर तो चालत राहिला. खरंतर त्याला खूप दमायला झाले होते आणि भूकही लागली होती तरीही तो चालत राहिला. शेवटी एकदाचे त्याला ओक्साका शहर दिसले.



ते शहर बघून बेनिटोचे डोळेच दिपले. त्याच्या दीडशे माणसांच्या वस्तीच्या गावापेक्षा हे शहर खूपच मोठे होते! सगळीकडे इमारतीच इमारती! काही दुमजली, काही तीन मजली तर काही त्याहूनही उंच!





आणि गर्दी, बापरे विचारूच नका! रस्ते लोकांनी गजबजलेले होते. काही लोक चालत होते, काही पळत होते, काही घोडागाडीत तर काही घोड्यावर स्वार! साऱ्या जगात एवढी माणसे असतील असे बेनिटोला वाटत होते पण इथे तर एवढी सगळी माणसे एकाच शहरात होती!



जोसेफा माझा कुटुंबाकडे स्वयंपाकाचे काम करीत होती. बेनिटो माझा कुटुंबाच्या घराचा पत्ता शोधत बहिणीकडे पोहोचला. आपल्या लहान भावाला भेटून जोसेफाला खूप आनंद झाला. पण बेनिटोच्या शाळेचा खर्च तिला परवडण्यासारखा नव्हता म्हणून त्याला काम करून शाळेची फी भरायला लागणार होती.

एका बुकबाईंडरला मदतनीस हवा होता. बेनिटो त्याच्याकडे काम करू लागला. त्याच्या बदल्यात बेनिटोच्या शाळेची फी मालक भरू लागला.

शेवटी एकदा बेनिटोने शाळेची पायरी चढली! त्याचे शिक्षण सुरू झाले. त्याला सारखं वाटे की, प्रत्येक जण माझ्यासारखे नशीबवान असावा म्हणजे त्यांनाही शाळेत जाता येईल.

बेनिटो खूप वर्षे शाळा कॉलेजात शिकला. पुढे त्याने स्वतःचा स्वतःही खूप अभ्यास केला. तो लिहायला वाचायला शिकलाच शिवाय त्याने इतिहास, विज्ञान आणि कायद्याचे शिक्षण घेतले. 1831 मध्ये वयाच्या 25 व्या वर्षी तो वकील बनला.

एक वकील म्हणून तो अनेकदा गरीब लोकांच्या केसेस घेत असे. असे लोक ज्यांना वकिलाची फी परवडत नसे. या लोकांकडे एकच गोष्ट होती, ती म्हणजे बेनिटोवरचा विश्वास! त्यांना खात्री होती की त्यांचा हा वकील त्यांची सर्वतोपरी मदत करेल.

बेनिटो जुआरेझला अजून खूप लोकांना मदत करायची होती. एक वकील म्हणून मर्यादा होत्या म्हणून त्याने सरकारमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला.



बेनिटो जुआरेझची ओक्साका राज्याच्या विविध सरकारी पदांवर निवड झाली. शेवटी ते राज्यपाल (गव्हर्नर) बनले.

सर्व मुलांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे म्हणून त्यांनी त्यांच्यासारख्या गरीब गावांमध्ये चाळीसहून अधिक शाळा काढायला मदत केली.



जुआरेझनी ओक्साकाच्या लोकांसाठी खूप कामे केली. विशेष करून स्थानिक इंडियन लोकांना त्यांनी मदत केली. “मी एक इंडियन आहे आणि मी माझ्या लोकांना विसरू शकत नाही”, असे ते नेहमी म्हणायचे.

जुआरेझ यांना गव्हर्नर म्हणून लोकांची पसंती मिळाली. मग लोकांना विश्वास वाटला की ते चांगले राष्ट्रपतीही बनतील. ते 1861 मध्ये मेक्सिकोचे राष्ट्रपती बनले.

परंतु लवकरच त्यांच्यासमोर मोठी अडचण निर्माण झाली. खूप दूरच्या फ्रान्सच्या राजाने मेक्सिको ताब्यात घ्यायचे ठरवले. मेक्सिकन लोकांशी लढायला समुद्र पार करून त्याने आपले सैन्य पाठवले. साल होते 1862.



फ्रेंच सैन्याला त्यांच्या ताकदीची पूर्ण कल्पना होती. म्हणून त्यांना आत्मविश्वास होता कि, ते ही अगदी लढाई सहजपणे जिंकतील.

मेक्सिकन लोकांना खबर लागली की फ्रेंच सैन्य मेक्सिको शहरातून जात आहे. मग त्यांनी आपला डेरा उंच डोंगरावर हलविला व फ्रेंच सैन्याची वाट बघत बसले.



सिन्को (पाच) डे(दिवस) मेयो (मे महिना), पाच मे च्या सकाळी फ्रेंच सैन्य पुएब्ला शहरात पोहोचल्याचे मेक्सिकन लोकांना दिसले.

हजारो फ्रेंच सैनिक घोड्यावर स्वार होते, हजारो चालत चढाई करत होते. त्यांच्या तलवारीची धारदार टोके एखाद्या काटेदार जंगलाच्या काट्यांसारखी निशाणा धरून होती. त्यांचे घोडे खडकाळ रस्त्यावरून मोठ्या, जड तोफा खेचून आणत होते.

जितकी शस्त्रे होती त्याहीपेक्षा अनेक पटीने त्यांचे सैनिक होते!

फ्रेंच सैन्य बलाढ्य आहे हे मेक्सिकन लोकांना पण माहीत होते. पण हे सैनिक लांबच्या खडतर प्रवासामुळे दमलेले बघून मेक्सिकन सैन्याला लढाई जिंकण्याची आशा वाटू लागली.

दोन्ही बाजू लढाईसाठी सज्ज झाल्या.

दुपारी दोनच्या आसपास लढाई सुरू झाली. फ्रेंचांना वाटले, लढाई एका झटक्यात संपून जाईल. त्यांना मेक्सिकन लोकांच्या मेहनतीचे व प्राणपणाने लढण्याच्या जिद्दीचे आश्चर्य वाटले. दोन तास उलटून गेले तरीही लढाई सुरूच होती.

फ्रेंच सैनिकांनी मेक्सिकन सैन्याची कमकुवत साखळी शोधली व पुन्हा स्वारी केली पण मेक्सिकन सैन्याच्या एका गटाने शर्थीने तो हल्ला परतवला.

दुपारनंतर फ्रेंच सैन्याच्या बंदुकीच्या गोळ्या, तोफ गोळे संपत आले. दोन्ही बाजूचे अनेक सैनिक जखमी झाले व अनेक सैनिक मरण पावले. शेवटी फ्रेंच सैनिक पळून गेले.

मेक्सिकन जिंकले! विवा (चिरायु) मेक्सिको! आता मेक्सिकोला कळून चुकले की तेही ताकदवान आहेत आणि फ्रेंच सैन्याला हरवू शकतात.



सिन्को डी मेयोच्या पराजयाची बातमी समजताच फ्रेंच राजाचा संताप झाला. त्याने तीस हजाराहून अधिक फ्रेंच सैनिक परत मेक्सिकोत पाठवले व शेवटी त्यांनी मेक्सिको सिटी वर कब्जा केला.

राष्ट्रपती जुआरेझवर पलायन करायची वेळ आली. पण मेक्सिकन झेंडा खाली उतरेपर्यंत ते तिथेच थांबले. झेंडा खाली उतरताच बँडवर मेक्सिकन राष्ट्रगीत वाजले.

राष्ट्रपती जुआरेझ यांनी झेंडा हातात घेऊन त्याचे चुंबन घेतले व “विवा मेक्सिको!” अशी घोषणा देऊन ते दूर पर्वतामध्ये पसार झाले.

पुढची पाच वर्षे फ्रान्सने मेक्सिकोवर राज्य केले. परंतु बेनिटो जुआरेझ व इतर नेते आपल्या परीने लढत राहिले. अनेकदा त्यांना अटक टाळण्यासाठी लपून बसावे लागे. पण त्यांनी हार खाल्ली नाही.

शेवटी 1867 मध्ये मेक्सिको जिंकले आणि फ्रेंच निघून गेले. परत एकदा मेक्सिको स्वतंत्र झाला. तेव्हापासून आत्तापर्यंत कुठलाही देश मेक्सिकोवर राज्य करू शकला नाही.

राष्ट्रपती बेनिटो जुआरेझ मेक्सिको सिटीत परत आले. त्यांनी परत एकदा मेक्सिको चा झेंडा फडकवला. “विवा मेक्सिको!”, अशी घोषणा दिली. जनतेनेही “विवा मेक्सिको!” “विवा मेक्सिको!” असे ओरडत त्यांना दुजोरा दिला आणि आसमंत दुमदुमला!

.



पाच मे

प्रत्येक देशात काही खास सुट्ट्या असतात. काही सुट्ट्या सण, जयंती साजरी करण्यासाठी असतात. तर काही सुट्ट्या इतिहासातल्या महत्त्वपूर्ण घटनेच्या आठवणीसाठी असतात. "सिन्को डे मेयो" Cinco de Mayo— पाच मे, हा मेक्सिकोमधील सुट्टीचा दिवस. पुएब्ला युद्धाची, फ्रेंच सैनिकांना दिलेल्या शर्थीच्या लढाईचा आठवणीचा दिवस. ज्या लोकांनी फ्रेंच हल्ला परतवून लावला त्यांना आदरांजली देण्याचा दिवस.

मेक्सिकोला पुन्हा मुक्त करण्यासाठी ज्या महान लोकांनी आपले प्राणपणाला लावले, त्या लोकांच्या सन्मानाचा हा दिवस. त्यांच्यापैकीच एक महान व्यक्ती म्हणजे बेनिटो जुआरेझ!